## जिल्हा न्यायालयांसाठी केंद्रीय ऑनलाइन भरती प्रक्रिया – २०२३.

संदर्भ – महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्हा न्यायालयांमधील रिक्त पदे भरण्यासाठी लघुलेखक (श्रेणी–३), कनिष्ठ लिपिक आणि शिपाई/हमाल या पदांसाठी दिनांक ०४/१२/२०२४ रोजीची मा. मुंबई उच्च न्यायालयाची जाहिरात.

### <u>सूचना</u>

याद्वारे सर्व संबंधित उमेदवारांना कळविण्यात येते की, माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १७/०५/२०२४ रोजीच्या **Special Leave to Appeal (C) No(S). 11351/2024** मध्ये दिलेल्या निर्देशा नुसार, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्हा न्यायालयांमधील लघुलेखक (श्रेणी–३), कनिष्ठ लिपिक आणि शिपाई/हमाल यांची रिक्त पदे भरण्यासाठी सुरु केलेली केंद्रीय भरती प्रक्रिया– २०२३ पुढील आदेश होईपर्यंत "जैसे थे स्थिती" ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

त्या अनुषंगाने सर्व उमेदवारांना सुचित करण्यात येते की, दिनांक २५/०५/२०२४ रोजी लघुलेखक (श्रेणी–३) पदासाठी इंग्रजी लघुलेखन चाचणी, मराठी लघुलेखन चाचणी व दिनांक ०२/०६/२०२४ रोजीची मराठी टंकलेखन चाचणी, इंग्रजी टंकलेखन चाचणी आणि दिनांक ०५/०६/२०२४ पासून जिल्हा न्यायालय, रायगड–अलिबाग येथे घेण्यात येणाऱ्या मुलाखती पुढील आदेश होईपर्यंत स्थगित करण्यात आलेल्या आहेत याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

Bhillare 22/5/24

(ए. बी. भिल्लारे)
प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड–अलिबाग

अलिबाग,
दिनांक २२/०५/२०२४

/home/ubuntu/1_Admn./Recruitment Process 2023/लघुलेखक श्रेणी ३/Annexure-A (copy).odt